# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 435 /शि.वि./२०१६
दि. 02/०३/२०१६

2698
3/3/16

प्रति,

मा. प्रमुख अग्निशमन अधिकारी,
अग्निशमन व आणिबाणी सेवा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- आपत्ती व्यवस्थापन संदर्भात शाळा/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जागृतीकरीता कार्यशाळासह प्रात्याक्षिक आयोजित करण्याबाबत.**

**संदर्भ :- आपले कार्यालयीन पत्र क्र. आपदा २६५३/अशा. दि.२६.०२.२०१६**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा.संचालक, अग्निशमन सेवा व मा. पोलिस महासंचालक तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार नैसर्गिक आपत्तीत भुकंप, अतिवृष्टीमध्ये इमारत कोसळणे, नागरीक पाण्यात वाहून जाणे, इमारतीत आग लागणे, लहान मोठे अपघात, अशा प्रसंगी जिवित व वित्त हानी होवू नये म्हणून करावयाच्या उपाययोजना, मदतकार्य याबाबत मनपा अधिनस्त शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखविण्याकरीता आपण संदर्भिय पत्राव्दारे कळविले आहे.

शालेय सत्रातील वार्षिक परीक्षा १५ मार्च पासून सुरु होणार आहे. त्यामुळे सदर प्रात्याक्षिके १५ मार्च पूर्वी मनपा शाळांत दाखविण्यास योग्य राहील असे वाटते. सोबत शाळांची झोननिहाय यादी संलग्न असून त्यानुसार आपल्या कार्यालयाकडून नियोजन करावे ही विनंती.

शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

03/3/16

प्रतिलिपी -
1) सर्व शाळा निरीक्षक, झो. क्र. 1 ते 10 यांनी आपल्या मातहत शाळांतील मु.अ. यांना सुचीत करण्याबाबत.
2) सर्व मु.अ., म.न.पा. यांनी शाळेत प्रात्यक्षिक दाखविणाऱ्या चमूस योग्य ते सहकार्य करण्यास्तव.

ASO Disaster cell

3/3/16